गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रसह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १६५ वा ● शनिवार ०४ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 165 | Date : 04/11/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4

# मराठवाड्याप्रमाणे कुणबी नोंदी शोधण्यासाठी आता राज्यभर मोहिम

## मराठा आरक्षणाबाबत कार्यवाहीच्या प्रगतीचा अहवाल दर आठवड्याला सादर करा: मुख्यमंत्री

मुंबई : मराठवाड्यात कुणबी नोंदी शोधण्यासाठी जी मोहिम राबविण्यात आली त्याप्रमाणे आता संपूर्ण राज्यभर ही प्रक्रिया मिशन मोडवर राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये यासंदर्भात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश देतानाच मराठा आरक्षणासंदर्भातील कार्यवाहीच्या कामकाजाच्या प्रगतीचा अहवाल दर आठवड्याला संकेतस्थळावर अपलोड करण्यास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. या कामाच्या संनियत्रणासाठी मंत्रालयस्तरावर अपर मुख्य सचिव दर्जाचे अधिकारी यांची देखील यावेळी नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यकक्षा आता राज्यभर वाढविण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर मागासवर्ग आयोगाला इम्पॅरीकल डेटासाठी आवश्यक ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर कार्यवाही करून महिन्याभरात ती उपलब्ध करून द्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्र्यांनी तातडीने मुख्य सचिव मनोज सौनिक, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांची बैठक घेतली. मराठा आरक्षणासाठी उपोषण करणारे मनोज जरांगे यांच्या समवेत काल राज्य शासनाच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेतील मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मुख्यमंत्र्यांनी आज विभागात कुणबी नोंदी तपासणीच्या कामाचा आढावा घेतला.



जिल्हाधिकाऱ्यांनी स्वताहून कुणबी नोंदी तपासण्यासाठी युद्धपातळीवर मोहिम हाती घ्यावी

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, राज्य शासन गांभीर्याने मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात कार्यवाही करीत आहे. त्यासाठी आता मराठवाड्यासह राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वताहून कुणबी नोंदी तपासण्यासाठी युद्धपातळीवर मोहिम हाती घ्यावी. त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी आणि त्यांच्या नियंत्रणाखाली कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून द्यावी. त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ, साधनसामुग्री देखील तातडीने देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मंत्रालयस्तरावर अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव विकास खारगे, विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी याबाबत संनियंत्रण करतील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

कुणबी मराठा, मराठा कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही गतिमान करावी

निवृत्त न्यायाधीश शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यकक्षा संपूर्ण राज्यभर वाढविण्यात आली असून ज्या पद्धतीने मराठवाड्यात नोंदी तपासण्यात आल्या तशीच कार्यपद्धती राज्यभर राबवावी असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. मराठवाड्यात शिंदे समितीने शिफारस केलेल्या पुराव्यांच्या आधारे कुणबी मराठा, मराठा कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही गतिमान करावी त्याचबरोबर प्रांत अधिकारी, तहसीलदार व जातपडताळणी समित्यांमधील अधिकारी, कर्मचारी यांना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण द्यावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मराठा आरक्षणासंदर्भात प्रशासनाचे दोन पातळीवर काम

मराठा आरक्षणासंदर्भात प्रशासन दोन पातळीवर काम करीत असून राज्यभर कुणबी नोंदी तपासण्याची कार्यवाही सुरू करतानाच दुसरीकडे राज्य मागासवर्ग आयोगाला इम्पॅरीकल डेटा जमा करण्यासाठी आवश्यक ती माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी । पान २ वर

## पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात : ना.विखे-पाटील

मुंबई : पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात, तसेच या योजनांचा लाभ जनतेला मिळण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निर्देश महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या विविध योजनांचा आढावा मंत्री श्री.विखे पाटील यांनी घेतला.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. हेमंत वसेकर, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर मेंढी व शेळी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शितलकुमार मुकणे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी श्री विखे पाटील म्हणाले, महामंडळाच्या प्रक्षेत्राचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरणासाठी निधी देण्यात आला आहे. महामंडळाचे भाग भांडवल वाढविण्याबाबत ही निर्णय घेण्यात येईल. राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेचा आढावा घेण्यात आला. महामंडळाच्या माध्यमातून शेळी समुह योजना प्रभावीपणे राबवाव्यात, तसेच या योजनांचा लाभ जनतेला मिळण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निर्देश ही यावेळी दिले.



## विदर्भ आणि मराठवाड्यातील दुग्धविकास प्रकल्पांचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आढावा

मुंबई : विदर्भ आणि मराठवाड्यासाठी दुग्धव्यवसाय उद्यमशीलतेचा विकास या महत्त्वपूर्ण प्रकल्पाबाबत आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक संपन्न झाली.



यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, राष्ट्रीय गोकुळ मिशनचे सहआयुक्त डॉ. भूषण त्यागी, राष्ट्रीय डेरी विकास बोर्डाचे अध्यक्ष डॉ. मीनेश शहा, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. हेमंत वसेकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.यावेळी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले, विदर्भ आणि मराठवाड्यासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन दुग्धविकास प्रकल्पावर चर्चा करण्यात आली. प्रकल्पाचे नियोजन चांगल्या पद्धतीने करण्यात आले असून पुढील पाच वर्षांसाठी तयार करण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल.उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, विदर्भ आणि मराठवाड्यातील दुग्धव्यवसायासाठी राज्य शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण प्रकल्पांचे सहकार्य घेण्यात येईल. तसेच यातून ३,३०,००० रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. राज्य सरकार यासाठी निधी देणार आहे.पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले,विदर्भ आणि मराठवाड्यातील दुग्धव्यवसायासाठी राज्य शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतील.

तसेच यावेळी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांनी विदर्भ आणि मराठवाड्यातील दुग्धव्यवसायासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## ‘ट्रॅव्हल्स’च्या दर्शनी भागात चालकाचे छायाचित्र! राज्यातील पहिला प्रयोग

नागपूर : खासगी ‘ट्रॅव्हल्स’च्या बसचालकाने मद्यपान करून वाहन चालवणे, वाहनात भ्रमणध्वनीचा वापर, महिला प्रवाशांसोबत गैरवर्तनसह इतरही बऱ्याच घटना घडल्या आहेत. त्यावर नियंत्रणासाठी नागपुरात प्रत्येक खासगी ट्रॅव्हल्स बसच्या दर्शनी भागात त्यातील चालकाचे छायाचित्र, भ्रमणध्वनी क्रमांकासह सर्व माहिती लावणे बंधनकारक राहणार आहे. राज्यातील हा पहिलाच पथदर्शी प्रकल्प उपराजधानीत होणार आहे. समाजमाध्यमावर नुकताच एका खासगी ‘ट्रॅव्हल्स’चा बसचालक हा वाहन चालवताना भ्रमणध्वनीवर चित्रपट बघत असल्याचे चलचित्र प्रसारित झाले होते. खासगी ‘ट्रॅव्हल्स बस’मधील हा सर्व गैरप्रकार थांबवण्यासाठी नागपुरात शहर पोलीस, प्रादेशिक परिवहन विभागाकडून संयुक्तरित्या एक अभिनव प्रकल्पावर काम करणे सुरू केले आहे. त्यानुसार संबंधित ‘ट्रॅव्हल्स’मध्ये ती चालवणाऱ्या बसचालकाचे छायाचित्र, भ्रमणध्वनी क्रमांक, पत्ता यासह सगळी माहिती दर्शनी भागात लावणे बंधनकारक केले जाईल. त्यामुळे कुणाला बसचालक वा बसमधील सोयीसुविधेची तक्रार असल्यास ते नावानिशी संबंधित यंत्रणेकडे करू शकतील. यामुळे गैरप्रकारांना आळा बसेल असे सांगितले जात आहे. ‘ट्रॅव्हल्स’ संचालकांनीही त्याला अनुकूलता दर्शवली आहे.




## भाजपचे ज्येष्ठ आमदार गोवर्धन शर्मा यांचे निधन

अकोला : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, आमदार तथा माजी राज्यमंत्री गोवर्धन शर्मा यांचे कर्करोगाच्या आजाराने शुक्रवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास अकोल्यात निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. अकोल्यातून सलग २९ वर्षे त्यांनी भाजपचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळे राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.अकोला पश्र्चिम विधानसभा मतदारसंघातून आमदार गोवर्धन शर्मा यांनी सलग सहा वेळा विजय मिळवला होता. सामाजिक क्षेत्रामध्ये सातत्याने ते कार्यरत होते. गोवर्धन शर्मांना गेल्या काही दिवसांपासून कर्करोगाने ग्रासले होते. जवळपास १५ दिवसांपूर्वी त्यांना मुंबई येथून अकोला येथील त्यांच्या घरी आणले होते. आज रात्री प्रकृती चिंताजनक होऊन त्यांचे निधन झाले. त्यांच्या घरी हितचिंतकांची एकच गर्दी झाली आहे. त्यांच्या मागे पत्नी, कृष्णा व अनुप ही दोन मुले, सून, नातवंडासह मोठे आप्त परिवार आहे.

## उजनी प्रकल्पातून रब्बीचे आवर्तन व पिण्याचे पाण्याचे माहे फेब्रुवारी २०२४ पर्यंतचे नियोजन : पालकमंत्री चंद्रकांत पाटील


**✻ उजनी प्रकल्पातून दिनांक ४ नोव्हेंबर २०२३ पासून पाणी सोडण्याचा निर्णय, पाणी सोडल्यानंतर परिसरातील वीज खंडित करावी. ✻ उजनी प्रकल्पात २ नोव्हेंबर २०२३ अखेर २९.३३ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध ✻ रब्बी हंगाम २०२३-२४ साठी ३.१६ टीएमसी पाणी, तर उर्वरित रब्बी हंगामासाठी ४४.२७ टीएमसी पाणी सोडण्यात येणार. ✻ सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून ५ टीएमसी तर हिळ्ळी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यापर्यंत ६ टीएमसी असे एकूण ११ टीएमसी पाणी सोडण्यात येणार.**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अंतर्गत उजनी प्रकल्पात दिनांक २ नोव्हेंबर २०२३ अखेर २९.३३ उपयुक्त पाणीसाठा तर ६३.६६ मृत पाणीसाठा असा एकूण ९२.९९ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. या उपलब्ध पाणी साठ्यातून रब्बीचे व पिण्याच्या पाण्याचे दोन आवर्तन माहे फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत पुरेसा राहील या पद्धतीने पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली. उजनी प्रकल्पातील उपलब्ध पाण्याच्या नियोजनाबाबत कालवा सल्लागार समितीच्या दूरदृश्यप्रणाली व्दारे आयोजित बैठकीत पालकमंत्री पाटील बोलत होते.

यावेळी आमदार सर्वश्री बबनदादा शिंदे, संजयमामा शिंदे, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते तर जिल्हाधिकारी कार्यालय येथून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, उपजिल्हाधिकारी महसूल विठ्ठल उदमले, जलसंपदाचे अधीक्षक अभियंता धीरज साळी, कार्यकारी संचालक श्री. कोल्हे, उजनी धरण व्यवस्थापन प्रकल्पाचे श्री. मोरे, भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. बागडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, जलसंपदा विभागाने रब्बी हंगाम २०२३-२४ व पिण्याच्या पाण्यासाठी उजनी प्रकल्पातून दिनांक ४ नोव्हेंबर २०२३ पासून पाणी सोडणेबाबत नियोजन केले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, पाण्याचा अपव्यय होणार नाही यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे पाणी सोडल्यानंतर आजूबाजूच्या परिसरातील वीज खंडित करावी जेणेकरून शेवटच्या ठिकाणापर्यंत पाणी पोहोचेल असेही त्यांनी सांगितले. तसेच हे पाणी आवर्तन सोडण्याचे नियोजन माहे फेब्रुवारी २०२४ अखेर पर्यंत चे असून त्यानंतरचे पाणी नियोजन कशा पद्धतीने करावयाचे याबाबत जानेवारी अखेरपर्यंत कालवा समितीची पुन्हा बैठक घेण्यात येणार असल्याचे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले.

✻खरीप हंगाम २०२३-२४ मधील पाणी वापर : खरीप हंगाम २०२३-२४ मधील प्रत्यक्ष पाणी वापर जलाशयाच्या वरील बाजूचा पाणी वापर ६.६४ खालील बाजूचा पाणी वापर ५.४५ टीएमसी असा एकूण १२.०९ टीएमसी पाणी वापर झालेला आहे.



✻रब्बी हंगाम २०२३-२४ मधील प्रत्यक्ष पाणी वापर : रब्बी हंगाम २०२३-२४ मधील दिनांक २ नोव्हेंबर २०२३ पर्यंतचा प्रत्यक्ष पाणी वापर हा जलाशयाच्या वरील बाजूचा २.६० टीएमसी तर जलाशयाच्या खालील बाजूचा ०.५६ टीएमसी असा एकूण ३.१६ टीएमसी झालेला आहे.

✻उर्वरित रब्बी हंगाम २०२३-२४ चे पाणी नियोजन : दिनांक २ नोव्हेंबर २०२३ रोजी उजनी प्रकल्पातील पाण्याची पातळी ४९४.५८० मीटर इतकी आहे तर एकूण पाणीसाठा ९२.९९ टीएमसी, उपयुक्त पाणीसाठा २९.३३ टीएमसी तर उपयुक्त पाणी साठेची टक्केवारी ५४.७५ टक्के आहे, अशी माहिती प्रकल्पाचे अध्यक्ष अभियंता धीरज साळी यांनी दिली.

उजनी प्रकल्पातून दिनांक २ नोव्हेंबर २०२३ ते २९ । पान २ वर

## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
– स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### शरीफ यांना जामीन मंजूर..

तीनदा पाकिस्तानचे पंतप्रधानपद भूषवलेले नवाझ शरीफ हे चार वर्षांनंतर मायदेशी परतले आहेत. देशातून हद्दपार केल्यानंतर त्यांनी चार वर्षे लंडनमध्ये काढली. स्वदेशी परतल्यावर त्यांनी लाहोरमध्ये एक जाहीरसभाही घेतली. पंतप्रधानपदी असताना नवाझ यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि लष्कराच्या मनातूनही ते उतरले. त्यांना सत्तेतून बाहेर जावे लागले. सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर वैद्यकीय उपचारासाठी ते ब्रिटनमध्ये गेले. पाकिस्तानातील न्यायव्यवस्थाही अजब असून सजा ठोठावली गेल्यानंतरदेखील अतिमहत्त्वाची व्यक्ती आरोपी असेल, तर ती विदेशात जाऊन मजेत राहूदेखील शकते. शिवाय लष्कराची मर्जी कधी कोणावर बसेल आणि कधी उतरेल, हे सांगता येत नाही. २०१९ च्या काहीकाळ आधी लष्कराला इम्रान खान हे पसंत पडले आणि ते पंतप्रधान झाले. त्यानंतर त्यांच्यावरही अनेक आरोप ठेवले जाऊन, त्यांचीही रवानगी तुरुंगात करण्यात आली. अमेरिकेने कारस्थान करून आपल्याला पंतप्रधानपदावरून हाकलले, असा आरोप इम्रान यांनी केला होता. तरीदेखील इम्रान यांच्याबद्दल पाकिस्तानात सहानुभूती असून त्यांची लोकप्रियता वाढूही शकते. निवडणुका झाल्यास इम्रान व त्यांच्या पक्षाला सतेत येण्यापासून रोखण्यासाठी लष्कर नवाझ यांच्यामागे उभे राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही वर्षांपूर्वी पनामा पेपर्स बाहेर आल्यानंतर, नवाझ यांनी परदेशात प्रचंड संपत्ती बनवली असून लंडनमध्ये त्यांनी घरही खरेदी केल्याचे समोर आले. सर्वोच्च न्यायालयाने तर त्यांनी राजकारणात सक्रिय होण्यावरच बंदी घातली आहे. त्यांना सरकारचे कोणतेही पद स्वीकारता येणार नाही, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. परंतु, तरीही पाकिस्तानात कुछ भी हो सकता है। नवाझ यांना भारताशी सलोख्याचे संबंध असावेत, असे वाटत होते. परंतु, लष्कराचा त्यास विरोध होता. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांनी लाहोर बसयात्रा केली. तेव्हा नवाझच पंतप्रधान होते. मात्र, त्यानंतर कारगिलमध्ये पाकिस्तानाने घुसखोरी केली तेव्हा परवेझ मुशर्रफ लष्करप्रमुख होते. मुशर्रफ यांनी बंड करून सत्ता हातात घेतली आणि शरीफ यांना तुरुंगात टाकले. त्यानंतर शरीफ यांनी देशांतर करून विदेश गाठले. पुढच्या टप्प्यात शरीफ पुन्हा एकदा पंतप्रधान झाले, तेव्हा पठाणकोट व उरी येथे पाक लष्कराने अतिरेकी हल्ले केले. त्यावरून शरीफ आणि पाकिस्तानी लष्कर यांचे मतभेद झाले होते. शरीफ यांच्या सुदैवाने आता इस्लामाबाद उच्च न्यायालयाने त्यांना अटकेपासून संरक्षण देणारा जामीन मंजूर केला आहे.

पान १ वरुन

## उजनी प्रकल्पातून रब्बीचे आवर्तन ..


फेब्रुवारी २०२४ या कालावधीत जलाशयाच्या वरील बाजूचा पाणी वापर व जलाशयाच्या खालील बाजूचा पाणी वापर करण्याचे नियोजन केलेले आहे. वरील बाजूचा पाणी वापर ११.९२ टीएमसी तर खालील बाजूचा पाणी वापर ३२.३५ टीएमसी असा एकूण ४४.२७ टीएमसी इतका पाणी वापर उपरोक्त कालावधीत केला जाणार असल्याची माहिती श्री. साळी यांनी दिली.

अ) जलाशयाच्या वरील बाजूचा पाणी वापर : बाष्पीभवन २.६६ टीएमसी, जलाशय उपसा सिंचन १.७२, जलाशय बिगर सिंचन पिण्यासाठी ०.८३, जलाशय बिगर सिंचन औद्योगिक ०.५८, जलाशयातील गाळ २.२६, सीना माढा उपसा सिंचन योजना आवर्तन एक व दोन २.८४ टीएमसी, दहिगाव उपसा सिंचन योजना आवर्तन एक व दोन १.०३ टीएमसी असा एकूण ११.९२ टीएमसी पाणी वापराचे नियोजन दिनांक २ नोव्हेंबर २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधी केले आहे.

ब) जलाशय खालील बाजूचा पाणी वापर नियोजन : १.कालवा प्रवाही सिंचन आवर्तन १( मान नदीवरील सात कोल्हापूर बंधारे व सीना नदीवरील नऊ कोल्हापूर बंधाऱ्याच्या फीडिंगसह) कालावधी ४ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर, ८ टीएमसी पाणी सोडण्यात येणार. २.कालवा प्रवाही सिंचन आवर्तन २- एक जानेवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ७ टीएमसी पाणी सोडण्यात येणार. ३. भीमा सीना जोड कालवा आवर्तन एक व दोन ४ नोव्हेंबर २०२३ ते ४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ६.३५ टीएमसी पाणी सोडण्यात येणार. ४. भीमा नदी आवर्तन (सोलापूर शहरासाठी) १ डिसेंबर २०२३ ते १० डिसेंबर २०२३ या कालावधीत ५ टीएमसी तर भीमा नदी आवर्तन (सोलापूर शहरासाठी हिळ्ळी कोल्हापूर पद्धतीचा बंधाऱ्यापर्यंत १ फेब्रुवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ६ टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे, असा एकूण ३२.३५ टीएमसी पाणी वापर खालील बाजूचा होणार असून जलाशयाच्या वरील व खालील बाजूचा एकूण रब्बी हंगाम पाणी वापर ४४.२७ टीएमसी असा राहील, अशी माहिती अधीक्षक अभियंता साळी यांनी दिली. उर्वरित रब्बी हंगामाचे नियोजन झाल्यानंतर २९ फेब्रुवारी २०२४ अखेर प्रकल्पाची पाणी पातळी ४८८.६३५ मीटर असेल तर एकूण पाणीसाठा ४८.७२ टीएमसी, उपयुक्त पाणीसाठा वजा १४.९५ टीएमसी तर उपयुक्त पाण्यासाठी ची टक्केवारी वजा २७.९०% इतकी राहील.

## महिलांसाठी जननी सुरक्षा व जननी शिशु सुरक्षा योजना

ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व अनुसूचित जाती जमातीच्या महिलांचे आरोग्य संस्थांमध्ये होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण वाढविणे व माता मृत्यू व अर्भक मृत्यू प्रमाण कमी करण्यासाठी जननी सुरक्षा योजना राबविण्यात येते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील सर्व गर्भवती महिला या योजनेसाठी लाभार्थी म्हणून पात्र आहेत. तसेच, बालकाला आवश्यक सेवा व उपचारात मदत करण्यासाठी जननी शिशु सुरक्षा योजना राबविली जात आहे. या योजनांबाबत थोडक्यातष्ठ..



जननी सुरक्षा योजना

गरोदर मातांची लवकर नोंदणी, किमान तीन तपासण्या व सेवांचा लाभ, संस्थात्मक प्रसूती, जोखमीची वेळीच नोंद घेऊन संदर्भ सेवा, गरजेनुसार सिझेरियनसाठी अर्थसहाय्य, याद्वारे माता मृत्यू अर्भक मृत्युदर कमी करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थीची प्रसूती घरी झाल्यास ५०० रुपये, शहरी भागातील लाभार्थीची प्रसूती शासकीय किंवा शासनमान्य मानांकित आरोग्य संस्थेत झाल्यास ६०० रुपये, ग्रामीण भागातील लाभार्थीची प्रसूती शासकीय किंवा शासनमान्य मानांकित आरोग्य संस्थेत झाल्यास ७०० रूपये, तर सिझेरिअन शस्त्रक्रिया झाल्यास लाभार्थीस १५०० रुपये लाभ देय आहे.

प्रसूती सेवा उपलब्ध असलेल्या सर्व शासकीय आरोग्य संस्था व शासन मानांकित खासगी आरोग्य संस्थेत या सेवा उपलब्ध असून सेवा मिळण्यासाठी रहिवासी दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला ही कागदपत्रे आवश्यक आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्रसुतीनंतर ७ दिवसांच्या आत या योजनेचा लाभ हा लाभार्थीच्या बँक खात्यावर डीबीटी, पीएफएमएसद्वारे, धनादेशाद्वारे देण्यात येतो. योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या आशा, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

जननी शिशु सुरक्षा योजना

या योजनेअंतर्गत गरोदर मातेस प्रसूती पश्चात ४२ दिवसांपर्यत मोफत सुविधा देण्यात येतात. प्रसूती, सिझेरीयन शस्त्रक्रिया, प्रसूती संदर्भातील गरोदरपणातील व प्रसूती पश्चात आवश्यक औषधे व साहित्य, प्रयोगशाळेतील तपासण्या, प्रसूती पश्चात आहार (स्वाभाविक प्रसूती ३ दिवस, सिझेरीयन प्रसूती ह्व ७ दिवस), मोफत रक्तसंक्रमण, घरापासून आरोग्य संस्थेपर्यत, एका आरोग्य संस्थेतून दुसऱ्या आरोग्य संस्थेत तसेच आरोग्य संस्थेतून घरापर्यत वाहतूक व्यवस्था करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच, या योजनेंतर्गत एक वर्षापर्यतच्या आजारी बालकास उपचारासाठी आवश्यक औषधे व साहित्य, प्रयोगशाळेतील तपासण्या, मोफत रक्तसंक्रमण, घरापासून आरोग्य संस्थेपर्यत, एका आरोग्य संस्थेतून दुसऱ्या आरोग्य संस्थेत तसेच आरोग्य संस्थेतून घरापर्यत वाहतूक व्यवस्था करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ही सेवा शासकीय आरोग्य संस्थेत उपलब्ध असून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर गरोदरपणाच्या काळात, प्रसूती दरम्यान, प्रसूतीनंतर ४२ दिवसांपर्यत व एक वर्षे वयापर्यतच्या आजारी बालकास सेवा पुरविली जाते. मुलांच्या आरोग्याबाबत, संगोपनाबाबत व विनामूल्य उपचाराबाबत आशा, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

## कलेचे रूपांतर झाले केशकर्तनालयात

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील सावर्णे या गावचा राजेश अनंत भला हा आदिवासी ठाकूर सुशिक्षित बेरोजगार राजेश अनंत भला या तरुणाने रोजगाराची भटकंती सोडून केशकर्तनालयाचा छंद आणि कलेचे रूपांतर आदिवासी विकास प्रकल्पाच्या आर्थिक सहाय्यातून आत्याधुनिक केशकर्तनालयाच्या व्यवसायात केले. राजेशची आता आर्थिक उन्नतीकडे आत्मविश्र्वासाने वाटचाल सुरू झाली आहे, राजेशची ही यशोगाथा आदिवासी बेरोजगारांना स्फूर्ती देणारी ठरावी.

ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील सावर्णे गाव माळशेज घाटाच्या पायथ्याशी असलेले आदिवासी समाजबहुल गाव ठाणे शहरापासून ११५ किलोमीटर अंतरावर आहे. सावर्णे गावची लोकसंख्या सुमारे ५०० असून राजेश अनंत भला या गावचा रहिवासी आहे. बारावी पर्यंत शिक्षण घेतलेला सुशिक्षित बेरोजगार तरुण. राजेशचे वडील तुटपुंजी शेती करतात, त्यांच्या शेती कामाला तो मदत करीत असे. शेतीनंतर रोजगारासाठी आजूबाजूच्या गावात भटकंती हा या कुटुंबाचा दिनक्रम.



या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी राजेशने मुरबाड तालुक्यातील मोरोशी येथील पोष्ट बेसिक आश्रमशाळेत बारावी पर्यंत शिक्षण घेतले. बारावी नंतर तो आठ महिने बेरोजगार होता. आता या बेरोजगारीतून बाहेर पडायचे तर काहीतरी करायचेच असा चंग त्याने मनाशी बांधला. पण कमी भांडवलामुळे व्यवसाय करण्याचे धाडस त्याला होईना. त्याला केशकर्तनाच्या कामाची आवड होती. त्याने ही कला छंद म्हणून जोपासण्याचा निर्णय घेतला. त्याने सावर्णे या आपल्या गावच्या घरातच कमी भांडवलातील केशकर्तनालयाचा व्यवसाय करण्यासाठी एक छोटा आरसा, कैची, वस्तरा, दाढीचे सामान खरेदी करून घरच्या घरी केस कापणे आणि दाढीचा व्यवसाय सुरू केला. त्याच्या या प्रामाणिक व्यवसायाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळू लागल्याने त्याची आर्थिक कमाई वाढू लागली. राजेश आता स्वत:च्या पायावर उभा राहिला.

राजेशने केशकर्तनालयाचा व्यवसाय मोठ्या गावात किंवा शहरात जाऊन अत्याधुनिक स्वरूपात करण्याचे ठरविले. मात्र त्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज होती. राजेशचे जिवलग छायाचित्रकार मित्र श्री.जयराम मेंगाळ यांनी त्याला आदिवासी विकास विभागाच्या न्यूक्लिअस बजेट योजनेतून शंभर टक्के अनुदानावर मिळणाऱ्या अर्थसहाय्य योजनेची माहिती दिली.

त्यांच्या मार्गदर्शनानुसार राजेश भला याने शहापूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधला. तेथील न्यूक्लिअस बजेट योजनेसंबंधी काम करणारे लिपिक श्री.अनिकेत दत्तात्रय पष्टे यांनी त्याच्या नियोजित व्यवसाय आणि अनुभवाची माहिती घेऊन अनुदान मागणीच्या अर्जाचा नमूना दिला आणि सोबत लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन केले. राजेशने लागलीच कागदपत्रांची पूर्तता करून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री. राजेंद्रकुमार हिवाळे यांच्याकडे विहित नमुन्यात अनुदान मागणीचा अर्ज सादर केला. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सुचने नुसार त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक श्री. सखाराम गोपाळ भोये यांनी राजेशच्या केशकर्तनालयाच्या अनुभवाची खात्री करून तो जय ठिकाणी सदरचा व्यवसाय सुरू करणार आहे त्या गाळ्याची पहाणी करून तांत्रिक बाबींची पूर्तता करून घेतली आणि राजेशचा अनुदान मागणीचा प्रस्ताव प्रकल्प अधिकाऱ्यांकडे मंजुरी साठी सादर केला. प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे यांनी तो अग्रक्रमाने मंजूरही केला.

त्यानंतर राजेशने बँक ऑफ महाराष्ट्र न्याहाडी शाखेत बचत खाते उघडून नियमानुसार लाभार्थीचा आर्थिक सहभाग म्हणून रु. ६ हजार ७५० मात्र बँकेत जमा केले. त्यानंतर त्याला सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात शासनाकडून मंजूर झालेल्या ३९ हजार २५० रुपयांची अनुदानाची रक्कम मिळून त्याच्या खात्यावर ४५ हजार रुपये इतकी रक्कम जमा झाली.

राजेश भला याने नजीकच्या कल्याण-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या मोरोशी नाका येथे भाडे तत्वावर एक गाळा घेऊन मिळालेल्या अनुदानातून केशकर्तनालयासाठी लागणारे साहित्य जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथून खरेदी केले. त्यातून गोल फिरणाऱ्या खुर्च्या, आरसे, लहान मोठे कंगवे, वस्तारा, ट्रिमर मशीन, ब्लेड, केस रंगविण्यासाठी विविध रंगांचे कलफ, ब्रश, दाढीचे शेव्हींग क्रीम, स्प्रे, दाढीचे ब्रश, कापडी अप्रॉन, कैची, आफ्टर शेव्हींग लोशन, इत्यादि आवश्यक सामान खरेदी केले.आवडीचा व्यवसाय करायला मिळाल्यामुळे लवकरच राजेश व्यवसायात चांगला स्थिर झाला आणि त्याचे कामही चांगले असल्यामुळे ग्राहकांची संख्याही वाढू लागली. मिळालेल्या नफ्यातून त्याने दुकानाच्या अंतर्गत सजावटीसह आधुनिक पद्धतीची विद्युत रोषणाई, पंखे, प्रतिक्षेत असणाऱ्या गिऱ्हाईकांना लाकडी बाकडा असे इतर साहित्य खरेदी केले. राजेशचे आर्थिक उत्पन्न वाढू लागले, परंतु सामाजिक बांधिलकीतून गावच्या गरजू बांधवांच्या बारसे, मुंज, उत्तरकार्यासाठी मुंडण अशी कामे नाममात्र मानधनात करण्याचे कर्तव्यही निभावत आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाद्वारे केंद्रवर्ती अर्थसंकल्प म्हणजेच न्यूक्लिअस बजेट अंतर्गत अनुदानातून आदिवासी आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगारातून आर्थिक उन्नतीकडे नेणारी योजना आहे. राजेश भला या आदिवासी ठाकूर जमातीच्या तरुणाला स्वयंरोजगारासाठी आर्थिक अनुदान मिळाल्याने त्याचा भाग्योदय झाला आहे. ठाणे जिल्ह्यातील अशा अनेक आदिवासी बांधवांसाठी ही योजना वरदानच ठरली आहे, असे प्रकल्प अधिकारी श्री. राजेंद्रकुमार हिवाळे यांनी सांगून राजेशच्या पुढील वाटचालीचे मनापासून कौतुक केले आहे.

**लेखक : धनंजय प्र. कासार, सहाय्यक छायाचित्रकार, जिल्हा माहिती कार्यालय ठाणे**

## मराठवाड्याप्रमाणे कुणबी नोंदी

तातडीने सादर करावी, असेही त्यांनी सांगितले. इम्पॅरीकल डेटा गोळा करण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था, गोखले इन्स्टीट्यूट ऑफ पॉलिस्टीक्स अण्ड इकॉनॉमिक्स आणि इंडियन इन्स्टीट्युट ऑफ पॉप्युलेशन स्टडीज यासंस्थांची मदत घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

महिला उद्योजकांना कर्ज वाटपासाठी विशेष योजना तयार करा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत देण्यात येणारे कर्ज तातडीने उपलब्ध होईल यासाठी कार्यपद्धती निश्र्चित करण्याचे निर्देश देतानाच कर्ज वितरणामध्ये वाढ झाली पाहिजे, महिला उद्योजकांना कर्ज वाटपासाठी विशेष योजना तयार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. यासंदर्भात बँकांची बैठक घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अधिक सक्षम त्याचा लाभ मराठा समाजातील नागरिकांना द्यावा.

भाडेतत्वावर जागा घेऊन तातडीने वसतीगृहे सुरू करा

मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी विभागाने भाडेतत्वावर जागा घेऊन तातडीने वसतीगृहे सुरू करण्याचे निर्देश देऊन त्याबाबतचा दर आठवड्याला अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.जेथे वसतिगृह उपलब्ध होत नाहीत अशा महानगर असलेल्या मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक या जिल्ह्याच्या ठिकाणी प्रति वर्ष प्रति विद्यार्थी ६० हजार रुपये निर्वाह भत्ता, विभागीय ठिकाण, विभागीय मुख्यालय व क वर्ग महापालिका असलेल्या जिल्ह्यांमध्ये प्रति वर्ष ५१ हजार रुपये निर्वाहभत्ता देण्यात येणार असून अन्य जिल्ह्यांच्या ठिकाणी ४३ हजार रुपये निर्वाहभत्ता तर तालुक्याच्या ठिकाणी ३८ हजार रुपये निर्वाह भत्ता मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही देण्यात येणार आहे. राज्यातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांची कार्यशाळा विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी राज्यातल्या सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांची तातडीने कार्यशाळा घेऊन शिंदे समितीच्या कामकाजाच्या संदर्भात व कोणती अभिलेखे तपासायची याबाबत मार्गदर्शन करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. राज्यातील कुणबी नोंदीचे अभिलेखांचे डिजिटायजेशन आणि प्रमाणीकरण करावे. मोडी, उर्दू लिपीतील अभिलेखांचे भाषांतर करून ते संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याची सुचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

## तासगांव, कवठेमहांकाळ, जत, आटपाडीचा ट्रिगर २ मध्ये समावेश करावा : पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे

सांगली : सांगली जिल्ह्यातील तासगांव, कवठेमहांकाळ, जत, आटपाडी हे नेहमी दुष्काळ असणारे तालुके आहेत. यावर्षी झालेला पाऊस, पिकांची परिस्थिती पाहता दुष्काळसदृश्य परिस्थिती असल्यामुळे तातडीने या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करणे आवश्यक आहे. तरी विशेष बाब म्हणून या सर्व तालुक्यांना दुष्काळाची दुसरी कळ (ट्रिगर २) लागू करून दुष्काळ जाहीर करण्याबाबतचे आदेश संबंधितांना द्यावेत, अशी विनंती कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांच्याकडे आज निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे कि, सांगली जिल्ह्यामध्ये चालू वर्षी सरासरी पर्जन्यमान ६२.३ टक्के झाले आहे. सांगली जिल्ह्यातील शिराळा, कडेगाव, खानापूर-विटा आणि मिरज या चार तालुक्यांना दुष्काळाची दुसरी कळ (ट्रिगर - २) लागू झालेली आहे. मात्र, तासगांव, कवठेमहांकाळ, जत आणि आटपाडी या तालुक्यामध्ये दुष्काळाची दुसरी कळ लागू झाली नसली तरी दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. या तालुक्यात नेहमी अत्यंत



कमी पर्जन्यमान होते. तसेच हे नेहमी दुष्काळ असणारे तालुके आहेत. यावर्षी झालेला पाऊस, पिकांची परिस्थिती पाहता दुष्काळसदृश्य परिस्थिती असल्यामुळे तातडीने या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करणे आवश्यक आहे. या तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव दि. २६ ऑक्टोबर रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करण्यात आला आहे. तरी विशेष बाब म्हणून या सर्व तालुक्यांना दुष्काळाची दुसरी कळ लागू करून तातडीने दुष्काळ जाहीर करणेबाबतचे आदेश संबंधितांना द्यावेत, ही विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

## केबल नेटवर्क कायद्याच्या भंगाबाबत माहितीचे आवाहन

सातारा/प्रतिनिधीः जिल्ह्यातील स्थानिक केबल वाहिन्यांवरुन प्रसारित होणाऱ्या खासगी वृत्त आणि मनोरंजन वाहिन्यांकडून केंद्र शासनाच्या केबल टेलिव्हिजन नेटवर्क्स ऑण्ड रेग्युलेशन क्ट १९९५ मधील तरतुदींचे पालन होत नसल्यास याची माहिती जिल्हा संनियंत्रण समितीकडे द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले.

जिल्हा पातळीवरील खासगी दूरचित्रवाणी वाहिन्यांसाठी गठित केलेल्या जिल्हासतरीय संनियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी श्री. डूडी यांच्या अध्यतेखाली संपन्न झाली. या बैठकीला अपर पोलीस अधीक्षक आँचल दलाल, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, समिती सदस्य शिवलिंग मेनकुदळे, ङ मनिषा बर्गे, सविता साबळे. तुषार तपासे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डूडी म्हणाले, जिल्ह्यातील सर्व खासगी केबल वाहिन्या नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील नोंदणीकृत नसलेल्या व अनधिकृतरीत्या प्रसारित होत असलेल्या वाहिन्यांची माहिती असल्यास नागरिकांनी ती जिल्हास्तरीय समितीला द्यावी. सर्व केबलवरुन प्रसारित होत असलेल्या व स्थानिक खासगी वाहिन्यांनी प्रसारणास आवश्यक ते परवाने मिळवून नोंदणी करुन घ्यावी.कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबतची माहिती आवश्यक त्या पुराव्यांसह लेखी स्वरुपात जिल्हा माहिती अधिकारी, नवीन प्रशासकीय इमारत, एसटी स्टॅण्डशेजारी , सातारा येथे द्यावी.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मुंढेवाडी ग्रामपंचायत सरपंचपदी गणेश कोळी याची बिनविरोध निवड



सोलापूर/देविदास माने : अक्कलकोट तालुक्यातील मुंढेवाडी ग्रामपंचायत सरपंचपदी गणेश कल्लप्पा कोळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. माजी सरपंच बापूराव पाटील यांनी राजीनामा दिल्याने ही करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आले यावेळी ही निवड करण्यात आली. यावेळी माजी सरपंच बापूराव पाटील ग्रामपंचायत सदस्य ज्योती कोळी सुरेश कोळी सुरेखा माळी सोनाली पवार धानव्वा स्वामी सचिन गायकवाड आप्पाशा अंकोशे मळसिद्ध दस्तापुरे महेश सोलापूरे आणप्पा कोळ शिवानंद गंदगे दरेप्पा अरवत राजकुमार सोलापूरे मल्लिनाथ कोळी राजकुमार कोळी ग्रामसेवक सचिन गायकवाड तलाठी महेश राठोड नागनाथ शिंदे अक्षय गंदगे आदी उपस्थित होते निवडीनंतर सरपंच कोळी यांचा माजी सरपंच बापूराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी सरपंच कोळी यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने शासकीय निधीतून गावाचा विकास करणार असल्याचे सांगितले. निवडीबद्दल आमदार सचिन कल्याण शेट्टी आणि माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी कोळी यांचे अभिनंदन केले आहे.

# अनुकंपा तत्वावर नोकरीकरिता आमरण उपोषण




धाराशिव/ सुधाकर रणदिवे : अनुकंपा तत्वावर नोकरी करीता घेण्यास टाळाटाळ होत असल्याच्या कारणाने शिक्षण सेवा मंडळ पांगरी संचलित न्यू इंग्लिश स्कुल आंबेजवळगे,तालुका,जिल्हा धाराशिव यांच्या विरोधात धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषणकर्ते मित्रजीत रामलिंग गायकवाड,व सुजाता रामलिंग गायकवाड, यांचे बेमुदत आमरण उपोषण सुरु आहे.सेवाकाळात पतीचे निधन झाल्यानंतर वारसांना अनुकंपा तत्वावरील नोकरी न मिळाल्यामुळे मृतक शिक्षकांच्या पत्नीने आपल्या मुलासह ३० ऑक्टोबर पासून धाराशिव जिल्ह्यधिकारी कार्यालय येथे उपोषणास सुरुवात केली आहे.माघील कित्येक वर्षांपासून नोकरी देण्यास टाळाटाळ होत असल्याचा उपोषणकर्त्यांचा आरोप आहे.शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्याचे सेवाकाळात निधन झाल्यास त्याचे पश्र्चात कुटुंबातील एका व्यक्तीला सर्वसम्मत अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे निर्देश आहेत. त्यानुषंगाने मृतक रामलिंग गायकवाड यांचा मुलगा मित्रजित रामलिंग गायकवाड यांना संस्थेत रिक्त असलेल्या पदावर अनुकंपा तत्वावर नोकरी दयावी म्हणून शिक्षण सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यां सोबतच शिक्षणाधिकारी यांना विनंती केली आहे.

# आवताडे शुगर कडून ऊस दराचा पहिला हप्ता २५५१ रुपये, कामगारांना ८.३३ % बोनस देणार: चेअरमन संजय आवताडे

## पहिल्या ११ साखर पोत्यांचे पुजन संपन्न



मंगळवेढा/प्रतिनिधीः तालुक्यात सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या नंदुरच्या आवताडे शुगर अँण्ड डिस्टीलरीज प्रायव्हेट लिमिटेड या साखर कारखान्याने उसाचा दर जाहीर केला असून पहिला हप्ता २५५१ रुपये देणार असल्याचे कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांनी जाहीर केले आहे. तर कामगारांना ८.३३% बोनस देणार असल्याचेही यावेळी चेअरमन संजय आवताडे यांनी सांगितले.

शुक्रवारी सकाळी कारखान्यावर चेअरमन संजय आवताडे यांच्या उपस्थितीत व कारखान्याचे टेक्निकल विभागाचे व्यवस्थापक सुहास शिनगारे व त्यांच्या पत्नी गौरी शिनगारे यांचे शुभहस्ते होमहवन व सत्यनारायण महापूजा करून डिस्टिलरी विभागाचा द्वितीय बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आला. यावेळी मंगळवेढा मार्केट कमिटीचे माजी सभापती मा. सोमनाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, डिस्टिलरी मॅनेजर संभाजी फाळके, विजय माने, पंप्पु काकेकर, शाम पवार, चंदू गोडसे, गोपाळ पवार, श्रीकांत पवार, मोहन पवार, बजीरंग जाधव, राहुल नागणे, तोहीद शेख, डॉ. जगताप, रमेश टाकणे, सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना चेअरमन संजय आवताडे म्हणाले की,

आमदार समाधान दादा आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली फॅब्रटेक समूहातून हा कारखाना खरेदी करून आवताडे शुगर मध्ये रूपांतरित केल्यानंतर पहिल्या गळीत हंगामामध्ये २३५० रुपये ऊस दर देत खाजगी कारखानदारी मध्ये सर्वाधिक दर दिला होता आम्ही हा कारखाना केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला असून या कारखान्यामधून आम्ही कोणताही स्वार्थ ठेवला नाही गेल्या गळीत हंगामामध्ये कारखान्याचे सर्व कर्मचारी, ऊस पुरवठादार, ऊस वाहतूकदार, ऊसतोड मजूर व कारखाना प्रशासनाने मन लावून व प्रामाणिक काम केल्यामुळे गतवर्षीचा गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडला यावेळीही असेच सहकार्य सर्व कर्मचारी, ऊस पुरवठादार, ऊस उत्पादक वाहतूकदार यांनी केले तर हाही गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडून शेतकऱ्यांचे समाधान होईल असा जास्तीत जास्त दर शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न असणार आहे.

तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्र्वास ठेवून आपला ऊस आवताडे शुगर ला घालून सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन आवताडे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# दक्षता जनजागृती सप्ताहाचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते रॅलीस हिरवा झेंडा दाखवून सुरुवात

सोलापूर/प्रतिनिधीः दक्षता जनजागृती सप्ताहाचे अनुषंगाने अँटीकरप्शन सोलापूर येथील अधिकारी जनजागृती केले. स्वराज्य प्रतिष्ठान पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील पन्नास विद्यार्थी यांच्या समवेत रॅलीचे आयोजन केले होते जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात केली सदर रॅली जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथून निघून सोलापूर शहरातील शासकीय विश्रामगृह सात रस्ता रंगभवन चौक पंचायत समिती उत्तर सोलापूर पंचायत समिती दक्षिण सोलापूर पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण येथून पुन्हा रंग भवन अँटीकरप्शन ब्युरो सोलापूर अशी काढण्यात आली सदर रॅली दरम्यान सोलापूर शहरातील मुख्य रस्त्यावरील महत्त्वाच्या ठिकाणी भिंतीपत्रके व माहितीपत्रके वाटण्यात आली तसेच तेथे उपस्थित नागरिकांना अँटीकरप्शन ब्युरो कार्यपद्धतीबाबत माहिती सांगण्यात आली तसेच परिसरातील नागरिकांना १० ६४ या टोल फ्री क्रमांक बाबत माहिती देण्यात आली. तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि, पुणे डॉ. शितल जानवे/खराडे व मा. जिल्हा सरकारी अभियोक्ता सोलापूर श्री. प्रवीणसिंह रजपूत व इतर सहा सरकारी अभियोक्ता यांचेसह सदर ठिकाणी भिंतीपत्रके व माहितीपत्रके वाटण्यात आली तसेच तेथे उपस्थित नागरिकांना अँटीकरप्शन ब्युरो कार्यपद्धतीबाबत माहिती सांगण्यात आली




# दीपावलीचा अस्सल ग्रामीण स्वाद माविम सोलापूर आयोजित दिवाळी मेळावा

सोलापूर/प्रतिनिधीः महिला आर्थिक विकास महामंडळ, सोलापूर यांच्या वतीने विविध योजनेतर्गंत स्थापन करण्यात आलेल्या महिला बचत गटांच्या उत्पादित मालाला बाजारपेठ मिळावी.

तसेच उत्पादीत मालाचा प्रचार व प्रसार व्हावा या अनुषंगाने दिनांक ०७ ते ०९ नोव्हेंबर २०२३ रोजी तीन दिवस जिल्हास्तरावर दिवाळी मेळाव्याचे पोलिस कल्याण केंद्र मुरारजी पेठ सोलापूर येथे आयोजन करण्यात आल्याचे महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे यांनी सांगितले आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळात विविध योजनेतर्गंत स्थापन जिल्ह्यात १० हजार ९३० स्वयंसहायता महिला बचत गट व १ लाख १५ हजार ६४१ सभासद आहेत. बचत गटाच्या चिरकालीन संस्था टिकण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात लोकसंचलित साधन केंद्र व शहरी भागात शहरस्तरीय संघ हि संकल्पना पुढे आली. या संकल्पनेच्या आधारे सदयस्थितीमध्ये जिल्ह्यात एकूण २२ ग्रामीण व १० शहरी केंद्र उभारण्यात आले आहेत. या सर्व केंद्रे शाश्र्वत होण्याच्या दृष्टीने केंद्राची कार्यकारिणी समिती सदस्य केंद्र यांच्या माध्यमातून चालवले जात आहेत.

नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प हा शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पाच्या माध्यमातून गरीब व गरजूवंत कुटुंबाचा सामाजिक आर्थिक विकास साधने असा असून, महिलांचे स्वयं सहाय्यता बचत स्थापन करुन विविध वित्त पुरवठा बँकाकडून वित्त पुरवठा केला जातो. एकूण ७ हजार २९२ गटांना २३६.०० कोटी रु कर्ज वितरण केले आहे.

त्यामधून महिलानी शेती बिगर शेती व्यवसायात भांडवल गुंतवणूक करून उद्योग व्यवसायाची उभारणी केली आहे.

ग्रामीण भागातील ताजे व स्वच्छ दिपावलीचे पदार्थ पणत्या आकाश कंदील विणकाम लाकडी कोरीव काम केलेल्या विविध वस्तु कापडी शिवणकाम केलेल्या वस्तु सुगंधी अत्तर व अगरबती यासह अनेक वस्तु प्रदर्शनात योग्य भावात मिळतील प्रदर्शन दर दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ९ पर्यंत असेल ग्रामीण महिलाच्या छोट्या मोठ्या व्यावसायाकडील वाटचालीस प्रोत्साहन देण्याकरिता जास्तीत जास्त नागरिकानी भेट देवून खरेदीचा आनंद घ्यावा असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री. लामगुंडेयांनीकेलेआहे.

# महार वतनदार ट्रस्ट अस्थिविहार प्रेरणाभूमीच्या वतीने साजरा होणाऱ्या कार्यक्रमाची बैठक संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः सालाबाद प्रमाणे यंदाही समस्त महार वतनदार ट्रस्ट अस्थिविहार प्रेरणाभूमी मिलिंद नगर बुधवार पेठच्या वतीने साजरा होणाऱ्या कार्यक्रमाची बैठक संपन्न २६-२७ नोव्हेंबर,६ डिसेंबर त्याच प्रमाणे १ जानेवारी हे दीन सालाबाद प्रमाणे या वर्षी ही साजरा करण्यासाठी समस्त महार वतनदार ट्रस्ट च्या सदस्यांची बैठक संपन्न झाली सदर बैठक ही सुभानजी बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली तर ज्येष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाखली पार पडली,

सदर बैठकीत मागील वर्षीचा जमा खर्च सादर करण्यात आला, व या वर्षी देखील सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पाडण्याचे ठरविण्यात आले.यां वर्षीची कार्यक्रमाची सभासद वर्गणी लवकरात लवकर शशी तळमोहिते यांच्या कडे जमा करण्यात यावी असे ठरविण्यात आले. प्रसंगी सर्व समस्त महार वतनदार ट्रस्ट चे सदस्य मिलिंद नगर मधील नागरिक उपस्थित होते.

# स्टार प्रवाहच्या कलाकारांचं अनोखं दिवाळी सेलिब्रेशन

## केअर इंडिया संस्थेतील मुलींना शालेय उपयोगी वस्तूंची भेट देत साजरी केली दिवाळी



मालिका असो वा कोणताही उपक्रम स्टार प्रवाह वहिनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा नेहमीच प्रयत्न करत असते. दिवाळीच्या निमित्ताने असाच एक अनोखा उपक्रम राबवण्यासाठी स्टार प्रवाहचे कलाकार एकत्र आले. मुलींच्या शिक्षणासाठी हातभार लावण्यासाठी स्टार प्रवाह परिवाराने शालेय उपयोगी वस्तू केअर इंडिया संस्थेत शिकणाऱ्या मुलींना भेट दिल्या. स्टार प्रवाहच्या मालिकांच्या सेटवर तंत्रज्ञांपासून ते अगदी कलाकारापर्यंत प्रत्येकाने स्वेच्छेने पुढाकार घेतला आणि सुरुवात झाली एका अनोख्या संकल्पाची. प्रत्येकाने जमेल तशी मदत केली आणि ज्या दिवसाची उत्सुकता होती तो दिवस उगवला. प्रेमाची गोष्ट मालिकेतील मुक्ता म्हणजेच तेजश्री प्रधान, लक्ष्मीच्या पाऊलांनी मालिकेतील कला म्हणजेच ईशा केसकर, शुभविवाह मालिकेतील भूमी-आकाश म्हणजेच यशोमान आपटे आणि मधुरा देशपांडे आणि ठिपक्यांची रांगोळी मालिकेतील कलाकारांनी केअर इंडिया संस्थेला स्टार प्रवाहकडून दिवाळी भेट दिली. डिस्ने स्टारशी जोडली गेलेली केअर इंडिया ही संस्था गेली अडीच वर्ष उडान या प्रोजेक्ट अंतर्गत मुलींच्या आधुनिक शिक्षणासाठी काम करत आहे. आर्थिक अडचणींमुळे ज्या मुलींना आधुनिक तंत्रज्ञान शिकता येत नाही अश्या मुलींसाठी केअर इंडिया ही संस्था आधुनिक शिक्षण देते. शालेय शिक्षणाच्या जोडीला डिजिटल लर्निंग, फायनान्शिअल लिटरेसी, इंग्लिश कम्युनिकेशन या नवनव्या गोष्टी शिकवल्या जातात. जेणेकरून मुलींना त्यांच्या पायावर उभं रहाता येईल. स्टार प्रवाह परिवाराने या मुलींना वह्या, पुस्तके, स्टेशनरी अश्या शालेय उपयोगी वस्तू भेट देत यंदाची दिवाळी खऱ्या अर्थाने संस्मरणीय केली.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# उत्तम कामकाज आणि सर्वांगीण विकास हेच अचलेर ग्रामपंचायतीचे ध्येय आणि उद्दिष्ट : सरपंच सौ कांताबाई सोलंकर

**आम्हाला ग्रामदैवत श्री मल्लिकार्जून देवाच्या आशीर्वादाने काही कमी नाही यापुढे देखील आम्ही गावा साठी पाच पंचवीस लाख खर्च करण्याची तयारी आहे विरोधकांनी विरोधाला जरूर विरोध करावा परंतू कारण नसतांना खोटे आणि बिनबुडाचे आरोप करू नयेत जनते समोर पुरावे ठेवा आणि मग बोलावे खोटे नाटे आरोप कुणालाही करता येतात– अनिल सोलंकर,अचलेर, ग्रामस्थ**



सोलापूर/महेश गायकवाड : उत्तम कामकाज आणि सर्वांगीण विकास हेच अचलेर ग्रामपंचायतीचे ध्येय आणि उद्दिष्ट असून चार चौकडी लोकांमुळे अचलेर ग्रामपंचायतीला बदनाम करण्याचे षढयंत्र रचण्यात आले आहे, गावांत सद्या सुरू असलेल्या विकास कामांमधून टक्केवरी खायला मिळत नसल्यामुळे काहीं उपटसुंब लोक काम नसल्यामुळे उप दव्याप करत आहोत अशी प्रतिक्रिया असंख्य ग्रामस्थानी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलतांना व्यक्त केली

लोहारा तालुक्यांतील अचलेर ग्रामपंचायतीचा कारभार हा पारदर्शी आणि विकासात्मक सुरू आहे परंतु हाच पारदर्शीपणा कोणाच्या तरी पोटात दुखत असल्यामुळे खुपत आहे यामुळे ग्रामपंचायतीला बदनाम करण्याचे काम केले जात आहे अशी प्रतिक्रिया गावकऱ्यांनी नोंदविली यावेळी बोलतांना अनेक ग्रामस्थानी सांगीतले की, यापूर्वी ही अनेक सरपंच आणि उपसरपंच महिला असताना त्यांच्या पती लोकांनीच कामकाज केले आहेत त्यावेळी त्यांना कुणी विचारले नाही परंतु बहुजन समाजातील महिला सरपंच झाल्यामुळे हे कोणालाही बघवेणा झाले आहे आहे असे ही ग्रामस्थानी म्हटले आहे,

सद्या ग्रामपंचायती मध्ये ओबीसी महिला सरपंच कार्यरत असुन यापूर्वीही लिंगायत समाजातील दोन महिला ओपन सरपंच पद भोगल्या आहेत यावेळी ही त्यांच्या घरातील पुरुष लोकांनीच कारभार केला आहे त्यांच्या कार्यकाळात दलीत वस्तीचा निधी पुर्णपणे हाडपण्यात आला असुन स्मशानभूमी ची काम न करता वाट लावण्यात आली आहे तर गावातली रस्ते आणि १३ आणि १४ व्या वित्त आयोगाच्या निधी मधील पैसा दिवा बत्ती आणि रस्त्याची कामे न करता गटारी न करता हडपण्यात आला आहे अजूनही त्या काळातील कामे अर्धवट पडून आहेत अशी माहिती ही ग्रामस्थानी दिली,सरपंच कांताबाई सोलंकर यांच्या कार्यकाळात व्यवस्थीत कामकाज सुरु असून परदर्शी पणाला महत्व आणि प्राधान्य दिले जात आहे गावातील सर्वच कामे हे सर्व सदस्यांना विश्र्वासात घेऊन सर्वांच्या सहमतीने केली जात आहेत परंतु कोणाला २० टक्के कोणाला १० टक्के देणे होत नाही, त्यामुळे टक्केवरी मिळत नसल्यामुळे नाराज लोक आणखी नाराज झाले असावेत , गावचा कारभार हा ओबीसी महिलेच्या हाती असल्यामुळे काहीं जातीयवादी आणी धन दांडग्या लोकांना हे खुपत आहे अशी प्रतिक्रिया गावातली एका सुजाण नागरिकांने व्यक्त केली.

गांवात मागील काळात अपूर्ण अवस्थेत सुरू असलेली कामे मोठया प्रमाणात केली जात आहेत भिम नगार येथील पिण्याच्या पाण्याचा टाकीचा प्रश्र्न असो की मेन बाजार पेठेतील जुन्या टाकीचा प्रश्र्न असो हि कामे व्यवस्थीत केली जात आहेत अशी ही माहिती मिळाली, यापूर्वी ही महिला सरपंच पद राखीव असताना कामकाज केले आहेत त्यावेळी त्यांनी केलेले कामकाज त्यांच्या पतीने च पाहिले की अन्य कुण्या दुसऱ्यांनी पाहिले आहे अशा संतप्त प्रतिक्रिया गावात उमटत आहेत

# दिवाळी सणाच्या दरम्यान वायू प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणाला आळा घालावा

**✻ सण साजरे करताना प्रकाशाचा वापर करावा, परंतु ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी**

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय हरित लवाद व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हिवाळयामध्ये दीपावली सणाच्या वेळी हवेची गुणवत्ता खराब होऊ नये. आपत्कालीन खराब हवेची स्थिति जिल्ह्यात व शहरात निर्माण होऊ नये यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे सर्व नागरिकांनी पालन करावे व वायु प्रदूषण आणि दोन्ही प्रदूषणाला आळा घालावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे फटाक्यांच्या दुष्परिणामांची व्यापक प्रसिद्धी करून जबाबदारीने वापर करण्यास प्रोत्साहन देण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. तसेच, केंद्रीय आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांना दिवाळी सणाच्या दरम्यान सभोवतालची हवा आणि आवाज पातळीचे विशेष निरीक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. तरी आपला जिल्हा व शहरातील प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी व नागरिकांनी पुढील प्रमाणे मार्गदर्शन सूचनांचे पालन करावे.

✻ वैज्ञानिकदृष्ट्या आवाज समस्या कमी करण्याच्या तीन सामान्य पद्धती आहेत:

ध्वनी स्रोत नियंत्रित करणे, श्रोत्यांच्या (प्राप्तकर्त्याच्या) कानाचे रक्षण करणे, स्त्रोतापासून श्रोत्यापर्यंतच्या ध्वनिक मार्गात बदल करणे. प्रकाशासह प्रदूषण विरहित पद्धतीने सण साजरे करावेत. दिवाळीच्या सणात ध्वनी विहिरीत फटाक्यांचा वापर करावा.फटाके फोडणे (विशेषतः गोंगाट करणारे) प्रतिबंधित केले पाहिजे आणि रात्री १० फटाके फोडू नयेत.

* सण-उत्सवांदरम्यान शहरातील मोकळ्या ठिकाणी फटाके फोडले जात असल्याने लोकांना केवळ आवाजच नाही तर धुराचाही सामना करावा लागतो. तरी याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती झाली पाहिजे यासाठी प्रत्येक शासकीय विभागाने त्यांच्या स्तरावरून प्रयत्न करावेत. तसेच नागरिकांनीही स्वतःहून फटाके फोडणार नाही असा निश्र्चय करावा.✻ फटाके फोडताना परिधान केलेल्या कपड्यांचे साहित्य सिंथेटिक नसावे, कॉटन चे कपडे असावेत.

✻ फटाके फोडण्याच्या परिसरात संरक्षण उपाय म्हणून नेहमी पाणी आणि वाळू ठेवा.

✻ फटाके फोडताना मुलांवर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे.

✻ मोकळ्या जागेत फटाके फोडा जेणेकरून 'गोंगाट करणाऱ्या' फटाक्यांचा आवाज पुन्हा येणार नाही.

✻ गोंगाट करणारे फटाके फोडताना ज्येष्ठ नागरिक आणि हृदयविकाराच्या रुग्णांप्रती आपली जबाबदारी लक्षात ठेवा. फटाक्याच्या आवाजाचा इतर कोणालाही त्रास होणार नाही याची प्रत्येकाने जबाबदारी घेतली पाहिजे. शिक्षण विभागाच्या वतीने मुलांना ध्वनी उत्सर्जित करणारे फटाके न फोडण्याची शपथ घेण्यास प्रोत्साहित करावे. प्रत्येक शाळा महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावरून याबाबत मुलांना मार्गदर्शन करावे. xi नो क्रॅकर झोनः सामुदायिक उपक्रम म्हणून, जनजागृतीचा एक भाग म्हणून सणांमध्ये 'नॉईज फ्री फटाके झोन' दर्शविणारे फलक/बोर्ड/होर्डिंग लावले जाऊ शकतात.

# अनुसूचित जातीसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची राज्यात समाधानकारक अंमलबजावणी : राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष अरुण हलदर

मुंबई : केंद्र व राज्य सरकारच्या अनुसूचित जातींसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची राज्यात समाधानकारक अंमलबजावणी होत आहे. या अंमलबजावणीचा अहवाल एक महिन्यात सादर करावा, असे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष अरुण हलदर यांनी सांगितले.

राज्याच्या अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांविषयी आढावा बैठक हॉटेल ताज पॅलेस मुंबई येथे झाली. त्यावेळी आयोगाचे श्री हलदर बोलत होते. यावेळी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य सुभाष पारधी, अंजू बाला उपस्थित होते.

श्री. हलदर म्हणाले,राज्यातील अनुसूचित जातींच्या कल्याणकारी योजना व कायद्याबाबतच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभाग व राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याकडून मागविलेल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्याच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल एक महिन्यात प्राप्त करून द्यावा,

त्यानंतर तो अहवाल केंद्र शासनाकडे आयोगाकडून सादर करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभागाचे सचिव व विविध विभागांच्या सचिवांसोबत अनुसूचित जातींच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा आज घेण्यात आला आहे.

या बैठकीस मुख्य सचिव मनोज सौनिक, पोलीस महासंचालक रजनीश शेठ, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, गृह विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये, समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे संचालक कौशल कुमार तसेच विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या बैठकीनंतर राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष अरुण हलदर यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी श्री. हलदर यांनी राज्याच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. अनुसूचित जातींसाठी उपलब्ध असलेल्या घटनात्मक बाबी, अनुशेष, रिक्त पदे, विविध पदांचे रोस्टर, अनुसूचित जातींच्या संरक्षण, कल्याण आणि सामाजिक-आर्थिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र आणि राज्य सरकारने आवश्यक उपाययोजनांच्या शिफारशींचा या अहवालांमध्ये समावेश असणार असल्याचे श्री. हलदर यांनी यावेळी सांगितले.

## शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक.. रब्बी पिकांसाठी उद्यापासून पाणी उपलब्ध होणार..



पंढरपूर/प्रतिनिधीः सन २०२३-२०२४ मधील उपलब्ध पाण्याचे आज दुपारी कालवा सल्लागार समितीची पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारा रब्बी पिकांसाठी उजनी कालवा पाणी नियोजन संदर्भात बैठक संपन्न झाली. शेतकरी बांधवांच्या पिकांची परिस्थिती लक्षात घेऊन तत्काळ पाणी सोडण्याची विनंती श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. श्री. अभिजीत (आबा) पाटील यांनी या बैठकीत केली. तसेच कालवा वरील सीआर भरुन द्यावे, तसेच पाणी सोडल्यावर वीज खंडित करू नये, अशा महत्त्वपूर्ण सुचना मांडल्या. उजनी उजवा व डावा कालवा तसेच बोगद्यातून पाणी सोडण्याचा निर्णय झाला आहे. शेतकरी बांधवांसाठी हा निर्णय निश्र्चितच लाभदायक ठरेल.यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता, सोलापूर जिल्ह्याचे सर्व आमदार, विविध पदाधिकारी व इतर विभागातील प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्योजक अतुल बेडेकर यांना श्रद्धांजली

मुंबई : घराघरात, मनामनांत मराठी व्यंजन संस्कृती पोहोचवणाऱ्या जुन्या मराठी उद्योग समुहाचा धडाडीचा वारसदार हरपला अशा भावना व्यक्त करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्ही. पी. बेडेकर ण्ड सन्स या मसाले कंपनीचे संचालक ज्येष्ठ उद्योजक अतुल बेडेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी म्हटले आहे की, शतकोत्तर वाटचालीत बेडेकर परिवाराच्या उद्योग समुहाने मानदंड निर्माण केला आहे. त्यांनी देश आणि विदेशात मसाले, लोणचे, पापड यांच्या माध्यमातून घराघरात स्थान निर्माण केले आहे. या उद्योग समुहाच्या चौथ्या पिढीचे अतुल प्रतिनिधीत्व करत होते. त्यांनी आपल्या धडाडीने या उद्योग समुहात काळानुरूप बदल घडवून घोडदौड चालू ठेवली होती. त्यांच्या निधनामुळे जुन्या - नव्या पिढ्यांच्या दरम्यानचा मार्गदर्शक दुवा निखळला आहे. त्यांच्या अकाली निधनाने झालेला आघात सहन करण्याची बेडेकर परिवाराला शक्ती मिळो, हीच ईश्र्वरचरणी प्रार्थना, अशा भावना व्यक्त करून मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ उद्योजक अतुल बेडेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केलीआहे.

## सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून ०५ ते १९ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजावितांना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणारनाहीत.

## दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त राज्यपालांनी दिली सत्यनिष्ठा प्रतिज्ञा



मुंबई : दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवनातील कर्मचारी व अधिकारी यांना भ्रष्टाचार निर्मूलनाची 'सत्यनिष्ठा प्रतिज्ञा' दिली.

देशाच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार मोठा अडथळा आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्यासाठी लाच न घेण्याची तसेच न लाच देण्याची, तसेच व्यापक समाज हितासाठी कार्य करण्याची शपथ राज्यपालांनी यावेळी उपस्थितांना दिली.

राज्यपालांच्या प्रभारी सचिव श्र्वेता सिंघल यांनी उपस्थितांसमोर राज्यपालांच्या तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संदेशांचे वाचन केले. भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी स्वातंत्र्याचा अमृतकाळ महत्त्वाचा आहे. देश भ्रष्टाचारमुक्त झाला तर विकसित भारताचे उद्दिष्ट अधिक लवकर साध्य करता येईल. या दृष्टीने वैयक्तिक तसेच संस्थात्मक स्तरावर पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सचोटीची संस्कृती रुजविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपालांनी आपल्या संदेशातून केले.

विकसित भारताच्या दिशेने जाताना भ्रष्टाचार मुळापासून नष्ट करणे हे शासनाचे प्रथम उद्दिष्ट आहे. दक्षता जनजागृती सप्ताहामुळे भ्रष्टाचाराची साखळी तोडण्यासाठी नागरिक जागरूक होतील, तसेच भ्रष्टाचार निर्मूलन चळवळीत नागरिकांचा सहभाग वाढेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या संदेशातून सांगितले. दि. ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत राज्यात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत असून 'भ्रष्टाचाराला नाही म्हणा; राष्ट्रासाठी वचनबद्ध व्हा' ही संकल्पना त्यासाठी निश्र्चित करण्यात आली आहे.

## दिवाळीपूर्व विवेकाच्या अमृतवाणीचा शुभारंभ




सोलापूर/प्रतिनिधीः मैत्रीतून स्नेह जपणारे प्रभु श्रीराम आणि निषादराज यांच्यामध्ये अदभुत प्रेम असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ निरूपणकार विवेकजी घळसासी यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर आणि आर्यन क्रिएशन यांच्या वतीने आयोजित पुना गाडगीळ प्रायोजित दिवाळीपूर्व विवेकाची अमृतवाणीच्या पहिल्या दिवशी ते बोलत होते. लोकमान्य टिळक सभागृह (अॅम्फी थिएटर) मध्ये सुरू झालेल्या या कार्यक्रमाचा शुभारंभ जयेश दर्बी कल्नेशनचे गिरीष दर्बी यांच्या हस्ते करण्यात आला.रामायण काळात प्रभु श्रीरामाच्या आधी निषादराज यांचा राज्याभिषेक झाला त्यानंतरच श्री रामाचा आयोध्येत राज्याभिषेक झाला. यावरूनच प्रभु श्रीरामाने आपली मैत्री निषादराज गुहा याच्याशी स्नेहपूर्ण कशी केली आणि त्यांची मैत्री टोकाच्या समर्पणाला कशी जाते याचाच प्रत्यय येतो. मैत्री शिवाय मार्ग नाही शब्दाचे मोल पाळणे हेच आध्यात्म आहे. प्रत्येकाने आपल्या घरात रामचरित मानस ठेवलाच पाहिजे ज्या घरात रामचरित मानस आहे त्या घरात सुख शांतता नांदते. प्रभु श्रीराम वनसावाला जाताना निषादराज गुहा यांची भेट होते त्या भेटीचे रूपांतर मैत्री आणि स्नेहात होते. त्यातूनच भरत शत्रुघ्न यांना निषादराज यांच्या रूपात लक्ष्मण दिसतात तर भरतच्या रूपात निषादराज यांना प्रभु श्रीराम दिसतात असा अनोखा स्नेह निर्माण होतो. साधा भक्तही भगवंताला मार्ग कसा दाखवतो हेच निषादराज यांच्यामधून दिसून येते. प्रभु श्रीराम स्नेही निषादराज या विषयावर आपल्या रसाळवाणीतून ज्येष्ठ निरूपणकार विवेकजी घळसासी यांनी राम आणि निषादराज यांच्या भेटीतील सान्निध्यातील प्रसंगाचे विवेचन केले. याच्या पहिल्या दिवशीच सकाळी ६. २५ वा. रसिक श्रोत्यांनी अॅम्फी थिएटर भरून गेले होते. प्रारंभी जयेश दर्बी कल्नेशनचे गिरीष दर्बी यांच्या हस्ते विवेकजी घळसासी यांना पुष्पहार घालून अमृतवाणीचा शुभारंभ करण्यात आला यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर, हास्यसम्राट प्रा.दिपक देशपांडे, कार्यवाह प्रशांत बडवे, अमोल धाबळे, गुरू वठारे, पुना गाडगीळचे जितेंद्र जोशी, अविनाश महागांवकर, शहाजी पवार, सुयश गुरूकुलचे केशव शिंदे, आर्यन क्रिएशनचे विनायक होटकर आदी उपस्थित होते. विवेकाची अमृतवाणीच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि. ४ नोव्हेंबर रोजी श्रीराम सेवक असलेल्या केवट यांच्यावर विवेचन होणार आहे.

## लोकशाहीतील सहभाग वाढविण्यासाठी तरुणांनी मतदार नोंदणी करावी : मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे



सातारा/प्रतिनिधी : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी व लोकशाहीतील त्यांचा सहभाग वाढविणे तसेच मतदार साक्षरता मंच सक्षम करणे यासाठी जिल्ह्यातील ३३ महाविद्यालयांशी करार झाला आहे. या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त तरुण मतदारांची नोंदणी करुन मतदान प्रकियेत त्यांना सामिल करुन घ्यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय महाराष्ट्र राज्य ,जिल्हाधिकारी कार्यालय सातारा व वर्शिप अर्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांसोबत कार्यशाळा व सामंजस्य करार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी श्री. देशपांडे यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. या यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्र्वर खिलारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, प्रांताधिकारी सुधाकर भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे, वर्शिप अर्थ फाउंडेशनचे तेजस गुराजती यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नव मतदारांची नोंदणी ९ डिसेंबरपर्यंत करावी, असे सांगून श्री. देशपांडे म्हणाले, मतदान प्रक्रियेत तरुणांचा सहभाग हा महत्वाचा आहे. यासाठी जिलह्यात जनजागृती कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणात आयोजित करावे या कामासाठी वर्शिप अर्थ फाउंडेशन समन्वयक म्हणून काम करीत आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या महाविद्यालयांचा सन्मानही करण्यात येणार असल्याचे श्री. देशपांडे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. डूडी म्हणाले, ग्रामीण भागातील मतदार हा शहरी भागाच्या मतदारांपेक्षा जागृत आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयांबरोबर करार झाले आहेत, अशा महाविद्यालयांनी जानेवारी २०२४ पासून शहरी भागात मतदान जागृतीचे कार्यक्रम घ्यावेत. यासाठी आत्तापासूनच नियोजन सुरु करा. या कार्यक्रमांना प्रशासनाचे अधिकारी उपस्थित राहून सर्व सहाकार्य करतील.

तरुणांमध्ये मतदार यादीत नाव नोंदणीबाबत उदासिनता दिसत आहे. विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणीसाठी आपल्या कुटुंब व नातेवाईकांपासून सुरुवात करावी. महाविद्यालयातील तसेच आपल्या परिसरातील एकही तरुण मतदार नोंदणी पासून वंचित राहणार नाही असे काम करावे. भारताची लोकशाही जगातील मोठी लोकशाही आहे, ही लोकशाही अधिक प्रगल्भ करण्यासाठी व पुढे नेहाण्यासाठी तरुणांचा सहभाग महत्वाचा असल्याचेही जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी यावेळी सांगितले.लोकशाहीचा पाया बळकट करण्यासाठी तरुणांनी मतदार नोंदणी करणे आवश्यक आहे. मतदार नोंदणीबाबत तरुणांमध्ये जनजागृती करणे महत्वाचे असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खिलारी यांनी सांगितले.

## राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या अध्यक्षांनी घेतली राज्यपालांची भेट



मुंबई : राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे प्रभारी अध्यक्ष अरुण हलदर यांनी आज महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.आपल्या मुंबई भेटीत आयोगाने अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील विविध योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतल्याची माहिती हलदर यांनी राज्यपालांना दिली.आयोगाच्या सदस्य डॉ अंजू बाला व सुभाष पारधी तसेच आयोगाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.